| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-१ |
|---|---|---|
| w'site : education.maharashtra.gov.in | Phone : (०२०) २६१२ ०३६१ | e-mail : doehighersec@gmail.com |


**तात्काळ प्रभावाने लागू.**

**क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२१/** २६८४
**दिनांक-३०/०८/२०२१**
30 AUG 2021

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर**

**संदर्भ:- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२१-२२**
प्रवेशासाठी जातीचा दाखला सादर करणे बाबत तसेच प्रवेश फेरी-१ मधील प्रवेशास मुदत वाढ देणेबाबत.

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका या पाच महानगर क्षेत्रांत इ.११वी प्रवेशासाठी विविध कागदपत्रे सादर करणे आवश्यक केलेले आहे. असे निदर्शनास आलेले आहे की, अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे स्वत:चे जातीचे प्रमाणपत्र नाही अथवा जात प्रमाणपत्र काढणेसाठी प्रस्ताव दाखल केलेला आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्या अभावी प्रवेशासाठी अडचणी येत आहेत, त्यानुषंगाने मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील निर्देशानुसार सदर बाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश मिळालेला आहे त्यांना जात प्रवर्गाबाबत कोणतीही कागदपत्रे सादर करणे आवश्यक असणार नाही.
२. ज्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र काढण्यासाठी प्रस्ताव दाखल केलेला आहे, त्यांनी सदर प्रस्तावाची पोच/ Acknowledgement आणि सोबत वडीलांचे जात प्रमाणपत्र सादर केल्यास असे विद्यार्थी त्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र असतील.
३. ज्या विद्यार्थ्यांकडे स्वत:चे जात प्रमाणपत्र तसेच प्रस्तावाची पोच/ Acknowledgement दोन्ही नाहीत त्यांनी प्रवेशासाठी वडीलांचे जात प्रमाणपत्र आणि हमीपत्र सादर केल्यास असे विद्यार्थी त्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र असतील.
४. वरील क्र.२ व ३ नुसार प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना ३० दिवसांत स्वत:चे जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील.
५. VJ/NT, OBC, SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रासोबत उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर NCL प्रमाणपत्र सादर करण्यासाठी हमीपत्र घेऊन ३० दिवसांची मुदत देणेबाबत यापूर्वी संकेतस्थळावर दिलेल्या सूचना कायम राहतील.
**६. नियमित फेरी-१ साठी प्रवेश घेण्यासाठी एक दिवस मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर प्रवेश दि.३१/०८/२०२१ रोजी सायं.०६:००वा पर्यंत सुरु राहतील.**

**टीप-** विद्यार्थ्यांनी अलॉटमेंट नंतर Proceed for Admission केल्यानंतर शाळा सोडल्याचा दाखला व इ.१०वी गुणपत्रक तसेच आवश्यक असल्यास NCL प्रमाणपत्र Student Login मध्ये अपलोड करणे विद्यार्थ्यांना आवश्यक आहे. तसेच कोटा प्रवेश विद्यार्थ्याचे परवानगी शिवाय केले जाऊ नयेत यासाठी OTP पद्धती लागू करण्यात आलेली आहे. त्याबाबत विद्यार्थी, पालक, विद्यालयांमध्ये जागृती करावी.

30·08·21
**(द. गो. जगताप)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत, माहितीस्तव.**
**मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे**